# Tata Power's Club Enerji organises Cyclothon in Mumbai

**Publication :** Loksatta
**Edition :** Mumbai
**Page No :** 3
**Date :** 22nd November 2016
**Headline :** Tata Power organizes Cyclothon

## टाटा पॉवरची सायक्लोथॉन

टाटा पॉवरच्या 'क्लब एनर्जी'द्वारे ऊर्जा संवर्धन व नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याप्रमाणे या वेळीही भांडुप येथील पवार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी १३० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. सायक्लोथॉनच्या माध्यमातून निवासी संकुलातील तसेच शाळेच्या परिसरातील नागरिकांना सामाजिक संदेश पोहोचविण्याचे काम करण्यात आले.

**Publication :** Sakal
**Edition :** Mumbai
**Page No :** 2
**Date :** 22nd November 2016
**Headline :** Cyclothon for environment protection

# पर्यावरण रक्षणासाठी सायकल फेरी

मुंबई, ता. २१ : पर्यावरण रक्षणाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीतर्फे नुकतीच भांडुपमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकल फेरी काढण्यात आली. जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाचे रक्षण करणे हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमाचा उद्देश होता. या उपक्रमात १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. सायक्लोथॉनमधून निवासी सोसायट्यांमधील तसेच शाळेसभोवतालच्या परिसरातील १२०० नागरिकांपर्यंत जनजागृतीचा संदेश पोहोचवण्यात आला होता. अनेक गंभीर मुद्द्यांवर पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

**Headline**: Club Enerji holds cyclothon
**Publication:** The Asian Age
**Date:** 20 November 2016
**Edition:** Mumbai
**Page No.:** 3



Anil Sardana

## Club Enerji holds cyclothon

**Mumbai:** Tata Power's Club Enerji organised a cyclothon with the students of Pawar Public School, Bhandup (west) in Mumbai. Close to 130 school students participated in the cyclothon and sensitised 1,200 citizens in the residential societies and around the school. Speaking on this initiative, Anil Sardana, CEO and managing director, Tata Power said, "The rationale behind engaging students through Club Enerji initiatives is to make them aware of the environmental issues while improving their sense of responsibility and involvement."

**Publication :** Lokmat

**Edition :** Mumbai
**Page No :** 3
**Date :** 21st November 2016
**Headline :** Cyclothon for environment awareness

# पर्यावरण जागृतीसाठी सायक्लोथॉन

## १३0 विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**मुंबई :** भांडुप पश्चिम येथील पवार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीतर्फे सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या सायक्लोथॉनमध्ये जवळपास १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सायक्लोथॉनच्या माध्यमातून जवळपास निवासी सोसायट्यांमधील तसेच शाळेभोवतालच्या परिसरातील १ हजार २०० नागरिकांपर्यंत जनजागृतीबाबत संदेश पोहोचवण्यात आला.

जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग) आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासंदर्भातील संदेश लोकापर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. वातावरणातील बदलाचे धोके लक्षात घेऊन लोकांनी पर्यावरणाचे रक्षण करावे, अशी विनंती या सायक्लोथॉनच्या माध्यमातून करण्यात आली. वातावरणातील बदलासारख्या गंभीर समस्येचा सामना संपूर्ण जगाला करावा लागत आहे.

त्यामुळे या समस्येचा सामना करताना ठोस पावले उचलणे गरजेचे आहे, हे सर्व लोकांसाठी अत्यावश्यक बनले आहे. पृथ्वीवर परिणाम करणाऱ्या अनेक गंभीर मुद्द्यांविषयी या मुलांनी पथनाट्याद्वारे जनजागृती करण्याचा प्रयत्न सायक्लोथॉनमध्ये केला. (प्रतिनिधी)